**A**

**CCE RF/PF/RR/**
**PR/NSR/NSPR**
**FULL SYLLABUS**

**ಕರ್ನಾಟಕ ಶಾಲಾ ಪರೀಕ್ಷೆ ಮತ್ತು ಮೌಲ್ಯನಿರ್ಣಯ ಮಂಡಲಿ, ಮಲ್ಲೇಶ್ವರಂ, ಬೆಂಗಳೂರು – 560 003**

**KARNATAKA SCHOOL EXAMINATION AND ASSESSMENT BOARD,**
**MALLESHWARAM, BENGALURU – 560 003**

**ಮಾರ್ಚ್/ಏಪ್ರಿಲ್ 2024 ರ ಪರೀಕ್ಷೆ - 1**

**MARCH/APRIL 2024 EXAMINATION - 1**

# ಮಾದರಿ ಉತ್ತರಗಳು

# MODEL ANSWERS

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 08-M** **Code No. : 08-M**

## ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ

## Subject : First Language — MARATHI

**(ಶಾಲಾ ಅಭ್ಯರ್ಥಿ / ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ / ಶಾಲಾ ಪುನರಾವರ್ತಿತ ಅಭ್ಯರ್ಥಿ / ಖಾಸಗಿ ಪುನರಾವರ್ತಿತ ಅಭ್ಯರ್ಥಿ / ಎನ್.ಎಸ್.ಆರ್. / ಎನ್.ಎಸ್.ಪಿ.ಆರ್.)**

**(Regular Fresh / Private Fresh / Regular Repeater / Private Repeater / NSR / NSPR)**

**ದಿನಾಂಕ : 25. 03. 2024 ]** **[ ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 100**

**Date : 25. 03. 2024 ]** **[ Max. Marks : 100**

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| **I.** | **पुढील प्रश्नांना प्रत्येकी चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य पर्याय निवडून उत्तर लिहा : 6 × 1 = 6** | |
| 1. | 'माझे डोके किल्ल्यात पाडावे' अधोरेखित शब्दाची विभक्ती ही आहे –<br>(अ) पंचमी (ब) सप्तमी<br>(क) संबोधन (ड) प्रथमा<br>**उत्तर :** (ब) सप्तमी | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 2. | 'वाग् + पति' या संधीचे उदाहरण आहे.<br>(अ) स्वरसंधी (ब) व्यंजनसंधी<br>(क) विसर्गसंधी (ड) पररूप संधी<br>**उत्तर :** (ब) व्यंजनसंधी | 1 |
| 3. | 'हरणाने कान टवकारले' हे खालील पैकी या प्रयोगाचे उदाहरण आहे.<br>(अ) कर्तरी प्रयोग (ब) कर्मणी प्रयोग<br>(क) भावे प्रयोग (ड) सकर्मक प्रयोग<br>**उत्तर :** (ब) कर्मणी प्रयोग | 1 |
| 4. | 'मी अभ्यास करतो' या वाक्यातील काळ ओळखा.<br>(अ) वर्तमान काळ (ब) भूतकाळ<br>(क) भविष्य काळ (ड) पूर्ण भूतकाळ<br>**उत्तर :** (अ) वर्तमान काळ | 1 |
| 5. | आयत्या बिळात ............... म्हण पूर्ण करा.<br>(अ) धोंडीबा (ब) कोंडीबा<br>(क) दाजीबा (ड) नागोबा<br>**उत्तर :** (ड) नागोबा | 1 |
| 6. | 'ऋणमुक्त' हे या समासाचे उदाहरण आहे.<br>(अ) तृतीया तत्पुरुष (ब) षष्ठी तत्पुरुष<br>(क) पंचमी तत्पुरुष (ड) द्वितीया तत्पुरुष<br>**उत्तर :** (क) पंचमी तत्पुरुष | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| II. | **पहिल्या दोन पदांचा संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा संबंधित शब्द लिहा :** **4 × 1 = 4** | |
| 7. | भाषण करणारा : वक्ता :: भाषण ऐकणारा : ……………… <br> **उत्तर :** श्रोता | 1 |
| 8. | झाडावर : शब्दयोगी अव्यय :: शाबास ! : ……………… <br> **उत्तर :** केवल प्रयोगी अव्यय | 1 |
| 9. | सफल : असफल :: खुरटणे : ……………… <br> **उत्तर :** वाढणे | 1 |
| 10. | घर : निवास :: राक्षस : ……………… <br> **उत्तर :** दानव, दैत्य, असुर | 1 |
| III. | **खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा :** **7 × 1 = 7** | |
| 11. | बुधवारी काकूबाई कोठे गेल्या होत्या ? <br> **उत्तर :** मुलाकरिंता नाटकाचे फुकट पास आणण्यासाठी | 1 |
| 12. | लेखक कोणत्या गोष्टीच्या विरुद्ध आहेत ? <br> **उत्तर :** पावसाळयात छत्री वापरण्याच्या विरूद्ध | 1 |
| 13. | 'मनाचे पिंजरे' या पाठाचे मूल्य काय आहे ? <br> **उत्तर :** व्यक्तिमत्व विकास | 1 |
| 14. | मूळ रुक्मिणी स्वयंवरातील ओव्यांची संख्या किती होती ? <br> **उत्तर :** 1880 ओव्या | 1 |
| 15. | शाहीर कोणाला म्हणतात ? <br> **उत्तर :** तमाशामध्ये गाणी आणि पोवाडे लिहिणाऱ्यास | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 16. | हरि कोणावर फिदा आहे ?<br>**उत्तर :** कविरायावर | 1 |
| 17. | 'पाठ आणि पोट यांचा झाला टाळ' ही कविता कोणत्या काव्यसंग्रहातून घेतलेली आहे ?<br>**उत्तर :** धृपद | 1 |
| **IV.**<br>18. | **खालील प्रश्नांची सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा : 3 × 2 = 6**<br>खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा :<br>(अ) आरती गाणे.<br>(ब) पाण उतारा करणे.<br>**उत्तर :** (अ) आरती गाणे – कौतुक करणे 1<br>(ब) पाणउतारा करणे – अपमान करणे<br>( मूळ वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करावा, अर्थाचा नाही ) 1 | 2 |
| 19. | अलंकार ओळखून लक्षणे सांगा.<br>''आक्का आणि अण्णांचा संसार जणू सापमुंगसाचं वैर.''<br>**उत्तर :** **उत्प्रेक्षा अलंकार** : 1<br>उपमेय हे जणू उपमान आहे असे वर्णन 1 | 2 |
| 20. | गण पाडून वृत्त ओळखा.<br>विद्याधिकार कुलशील सुरूपताही.<br>**उत्तर :** विद्याधि कारकु लशील सुरूप ताही<br>– – U – U U U – U U – U – – 1<br>त भ ज ज ग ग<br>लक्षणे – अक्षरसंख्या – 14<br>गण – त, भ, ज, ज, ग, ग 1<br>वृत्त – वसंततिलका | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| V. | **खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा :** <br> **7 × 2 = 14** | |
| 21. | 'मनुष्य एक झाड' असे लेखकास का वाटते ? <br> **उत्तर :** ऊन, पाऊस, वारा, थंडी, सावली, उष्णता या साऱ्यांचा जसा झाडावर परिणाम होतो, तसाच तो माणसावरही होतो. आसपासच्या वातावरणामुळे स्वभाव बदलतो. म्हणून मनुष्य एक झाड. | 2 |
| 22. | ''जात्यंघ हस्तीते पाहो गेले'' संदर्भासह अर्थ स्पष्ट करा. <br> **उत्तर : संदर्भ :** <br> पाठ – अनंतशक्तिः परमेश्वरू <br> लेखक – केसोबास <br> **स्पष्टीकरण –** परमेश्वराचे श्रेष्ठत्व कथन करण्यासाठी चक्रधर स्वामीनी हत्ती व आंधळे हा दृष्टांत सांगितला. त्यामध्ये हे वाक्य म्हटले आहे. | 2 |
| 23. | चिं. वि. जोशींचा परिचय लिहा. <br> **उत्तर :** चिंतामण विनायक जोशी – सुप्रसिद्ध विनोदी लेखक – सहविचार नियतकालिक, बडोदा–दप्तरदार एरंडाचे गुऱ्हाळ, चिमणरावांचे चऱ्हाट, ओसाडवाडीचे देव, वायफळाचा मळा इ. लेखन. | 2 |
| 24. | संत ज्ञानेश्वरांचा परिचय लिहा. <br> **उत्तर :** ज्ञानेश्वर विठ्ठलपंत कुलकर्णी – महान संतकवी व तत्वज्ञ 18 व्या वर्षी ज्ञानेश्वरी लिहिली. 21 व्या वर्षी संजीवन समाधी घेतली. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव चांगदेव पासष्टी इ. ग्रंथांचे लेखन. | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 25. | मुलांनी आईबापाबद्दल कोणता निर्णय घेतला होता ?<br>**उत्तर :** गणातात्याच्या मुलांनी तात्यांच्या संपत्तीची वाटणी केली होती. पण आईवडिलांना एकत्र सांभाळायला कुणीही तयार नव्हते. शेवटी एकट्याने बापाला सांभाळायचे व एकट्याने आईला अशी त्यांनी वाटणी केली. | 2 |
| 26. | श्रीकृष्णाला काय आवडणार नाही असे रुक्मिणी म्हणते ?<br>**उत्तर :** मला वाचविण्यासाठी तू लवकरात लवकर धाव घे. शिशुपालरूपी कोल्हा केव्हा धाड घालील हे कळेना. आणि त्याने तुझ्यासारख्या सिंहाच्या मालकीच्या भागावर धाड घालून पळवून न्यावे हे तुला आवडणार नाही. | 2 |
| 27. | ''कुठून आणतात तेल हळदीच्या वाटीचे बळ'' संदर्भासह अर्थ स्पष्ट करा.<br>**उत्तर : संदर्भ :** कविता – सुन्या तिच्याही दाही दिशा<br>कवयित्री – अनुराधा पाटील 1<br>**स्पष्टीकरण –** कष्टकरी ग्रामीण महिलांच्या जीवनात अनेक समस्या असतात, दुःखे असतात. पण ते सगळ कशा सहन करतात असा प्रश्न कवयित्रीला पडतो. 1 | 2 |
| **VI.** | **खालीलपैकी कोणत्याही एका कल्पनेचा विस्तार करा :** **1 × 3 = 3** | |
| 28. | (अ) बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले.<br>(ब) सत्यमेव जयते.<br>**उत्तर : एका कल्पनेचा विस्तार करा :**<br>i) कल्पनेचा शब्दशः अर्थ सांगणे 1<br>ii) उदाहरण व स्पष्टीकरण $1\frac{1}{2}$<br>iii) तात्पर्य $\frac{1}{2}$ | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| VII. | **खालील प्रश्नांची उत्तरे पाच–सहा वाक्यात लिहा :** **10 × 3 = 30** | |
| 29. | फिरंग्याने श्रीमंतांकडे कोणता तह केला ?<br>**उत्तर :** आमचे पदरी कारकून आहेत त्यांचा सांभाळ करावा. आणि आम्हास आठ दिवसांची मुदत द्यावी. म्हणजे आम्ही आमचा सरंजाम घेऊन जातो व किल्ला आपल्या हवाली करतो. दर साल 36 रु व पंधरा मण भात द्यावा. | 3 |
| 30. | विद्येसाठी डॉ० आंबेडकरांनी कोणकोणते कष्ट घेतले ?<br>**उत्तर :** आंबेडकरांनी विद्या मिळविण्यासाठी अतिशय कष्ट घेतले. लहानपणी दहा बाय दहाच्या खोलीत घासलेटच्या दिव्याच्या सहाय्याने अभ्यास केला. इंग्लंडमधील अभ्यासक्रम रात्रंदिवस एक करून कमी कालावधीत पूर्ण केला. रोज 21 तास अभ्यास करत. | 3 |
| 31. | जपानी तरुण मुलींची चेष्टा केव्हा होते ? जपानमध्ये कोणते निरुद्योगी प्रकार आढळत नाहीत ?<br>**उत्तर :** जपानमधील तरूणी कोणतेही काम न करता जर घरी बसून राहिल्या तर त्यांची चेष्टा होते. $1\frac{1}{2}$<br>रस्त्यात उगीचच घोटाळत उभं राहून मुलींची चेष्टा करणं किंवा त्यांना काही त्रास देणं हे निरूद्योगी प्रकार जपानमध्ये नाहीत. $1\frac{1}{2}$ | 3 |
| 32. | सावित्रीबाई शिक्षिका म्हणून शाळेत जाऊ लागल्यावर लोकांनी कोणत्या प्रतिक्रिया दर्शविल्या ?<br>**उत्तर :** सावित्रीबाई शिक्षिका म्हणून शाळेत शिकवायला जाऊ लागल्यावर लोक त्यांची छेड काढायला लागले. थुंकायचे, कुणी आडवं येऊन खाकरायचे काहीजण शाळेच्या खिडक्यासमोर जमा होऊन शिव्या द्यायचे, ओरडायचे. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 33. | धारवाडच्या राष्ट्रीय विद्यालयाचे वातावरण कसे होते ?<br>**उत्तर :** धारवाडच्या राष्ट्रीय विद्यालयात विद्यार्थ्यांना देशप्रेमाचे धडे दिले जात होते. या शाळेत वंदेमातरम ही प्रार्थना होते. अनेक राजकारणी मंडळी व नामवंत साहित्यिक शाळेला भेट देत असत. | 3 |
| 34. | माणसाला येणारी दुखणी आणि पाहुणे यातील साम्य कवीनी कसे सांगितले आहे ?<br>**उत्तर :** डोंगळे, डास, घुंगुरटी यासारख्या कीटकापासून होणारे आजार मानवाला त्रासदायक असतात. आणि आजार हा कधीही सांगून येत नाही. तसेच काही पाहुणे सुद्धा न सांगता येतात व ठाण मांडून बसतात. परत जाण्याचे नाव काढत नाहीत. त्यामुळे दुखणी आणि पाहुणे यात साम्य दिसून येते. | 3 |
| 35. | देशातील सकलास मानवता व राष्ट्रभावना कळल्याने काय होईल ?<br>**उत्तर :** देशातील सर्वांना राष्ट्रभावना, मानवता कळल्याने एकी निर्माण होईल, जातीभेद नष्ट होईल, गरीब श्रीमंत आनंदाने नांदतील असा कवीला विश्वास वाटतो. | 3 |
| 36. | पृथ्वीचे प्रेम मिळावे म्हणून कोण कोण व कशाप्रकारे याचना करीत आहेत ?<br>**उत्तर :** तारे – नटूनथटून येतात उल्कारूपी फुलांचा वर्षाव<br>चंद्र – घनघोर तपश्चर्या करतो.<br>शुक्र – पहाटेच्यावेळी तेजाचा पिसारा फुलवितो<br>ध्रुव – संन्यस्त ऋषीचा अवतार धारण करतो.<br>धूमकेतू–एखाद्या वेड्याप्रमाणे केस पिंजारून फिरतो. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 37. | काठी हातात आल्यावर गुराख्याने काय केले ?<br>**उत्तर :** बालपणीचे खेळ खेळायच्या वयात लहानय्या मुलाच्या हातात काठी येते व त्याला गुरे राखावी लागतात. ढीगभर गाईगुरांच्या मात्रे धावताना त्याची दमछाक होते. जनावरे पांगतात. तो त्याना मारबडव करतो शेवटी दमून जातो रडत बसतो. काट्याकुट्यातून फिरल्यामुळे त्याचे पाय निब्बर होतात. | 3 |
| 38. | धरण कवितेतील स्त्रीच्या गरीब परिस्थितीचे वर्णन कसे केले आहे ?<br>**उत्तर :** धरणाच्या बांधकामावर काम करणारी स्त्री ही अतिशय कष्टमय जीवन जगते. तिच्याकडे दळणासाठी धान्य नाही. ती कणीकोंडा शिजवते. स्वतःच्या तान्हुल्या बाळाला टोपलीखाली झोपवते व कामावर जाते. पोटापाण्यासाठी दिवसभर उन्हात राबते. | 3 |
| **VIII.**<br>39. | **खालील प्रश्नांची उत्तरे आठ–दहा वाक्यात लिहा : 4 × 4 = 16**<br>आपला मुलगा पास झाल्याचा आनंद आक्का का व्यक्त करु शकत नव्हती ?<br>**उत्तर :** लेखकाने आपण पास झाल्याची बातमी सांगूनही आक्काच्या चेहऱ्यावर आनंदापेक्षा काळजीच जास्त जाणवत होती. घरची परिस्थिती लक्षात घेता आपल्या मुलाच्या पुढील शिक्षणाचा खर्च कसा करायचा पैसे कुठून जमवायचे अशा अनेक चिंतानी तिला ग्रासले होते. | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 40. | डॉक्टरांनी घेतलेल्या शिबिराचा अदृश्य परिणाम कोणता होता ?<br>**किंवा**<br>शिबिरं कोणासाठी घ्यावीत असे डॉक्टराना वाटले ? पर्यावरण या विषयांच महत्व डॉक्टर कसे पटवून देत ?<br>**उत्तर :** या शिबिरांचा अदृश्य परिणाम म्हणजे जवळ-जवळ पाचशे कार्यकर्ते तयार झाले. कार्यकर्त्यांची एक फळी उभी राहिली. कार्यकर्त्यांनी परिसरात जाऊन शेतीविषयक प्रयोग सुरु केले. सरकारी योजना, कर्ज, कर्जमाफी याविषयी लोकांना ज्ञात केले. त्यामुळे मेळघाटामध्ये शेतकरी आत्महत्या कमी झाल्या.<br>**किंवा**<br>प्रबोधन शिबीरे सरसकट गावातील सर्वांसाठी न घेता फक्त तरूणांसाठी घेतली तर उपयुक्त होतील हा विचार करून फक्त तरूणांसाठीच शिबीर भरवले.<br>पर्यावरण ही महत्वाची साधन संपत्ती आहे. या संपत्तीचे मालक तुम्ही आहात याचे संरक्षण करा. नोकरीसाठी शहराकडे न जाता इथेच व्यवसाय निर्माण करा. | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 41. | ‘गाऊ त्यांना आरती’ या कवितेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.<br><br>**किंवा**<br><br>कवी कोणाकोणाचे गुणगान करु इच्छितो ? का ?<br><br>**उत्तर :** कवी यशवंत पेंढारकर यांनी राष्ट्र व समाज यासाठी त्याग केलेल्या लोकांचा गुणगौरव केला. आपल्या देशात अनेक थोरपुरुष जन्माला आले व राष्ट्राचा उद्धार करण्यासाठी प्राण अर्पण केला, संभ्रमाव स्थेतील लोकांना ज्यांनी मार्ग दाखवला, आपल्या स्वार्थी वृत्तीला मुरड घालून फक्त परोपकार केला, देशाला देवरूप मानून गुलामगिरी नष्ट करण्यासाठी ज्यानी प्रयत्न केले त्यांची आरती गाऊ असे सांगतात.<br><br>**किंवा**<br><br>त्याग व बलिदान करणाऱ्या सर्वांचे गुणगान, राष्ट्ररूपी चक्राचा उद्धार करण्यासाठी जे कर्णाप्रमाणे लढले, गोंधळलेल्या जनतेला ज्यांनी कृष्णाप्रमाणे मार्गदर्शन केले, स्वार्थी वृत्ती बाजूला ठेऊन ज्यांनी परोपकार केला, आपल्या जीवाची पर्वा न करता लोकसेवा केली त्या सर्वांचे गुणगान करु इच्छीतात. | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 42. | खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा :<br>पहिल्या हिरव्या ...........................<br>..............................................<br>..............................................<br>............................. धरणीच्या पोटी.<br>**किंवा**<br>कवच भूमिचे ................................<br>................................................<br>................................................<br>.................................. मात मृत्युवर.<br>**उत्तर :** पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार<br>उरि जेव्हा ज्वालारस झेलून<br>धरतीने तप केले दारूण<br>सुकता सुकता नद्या म्हणाल्या हाच विश्वसंहार<br>पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार<br>त्या काळी धरणीच्या पोटी.<br>**किंवा**<br>कवच भूमीचे आणि अचानक<br>भेदूनि आले इवले कौतुक<br>नचिकेताचे स्वप्नच अथवा अवचित हो साकार<br>पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार<br>मातीची ही मात मृत्युवर. | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| **IX.** | **खाली दिलेला उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा :** | |
| 43. | आज भारत देशातील श्रेष्ठ व्यक्तिचे कडून आयुष्याचा अर्थ नि व्यवहार नियम जाणून घ्यावेत, राष्ट्रीय एकात्मता धर्म, वर्ण, पंथ, जात, काहीही असो. व्यक्तिचे जीवन यशस्वी करणारी संघर्षरहित अशी आदर्श समाज व्यवस्था आवश्यक असते. जगातील महासत्ता आणि देश शांतीच्या शोधात आहेत. अनादी काळापासून भारतभूमी ही शांतिभूमी आहे. इतर राष्ट्राना शांतीचा संदेश देण्यासाठी आणि जीवनाचे उच्च ध्येय समजावून सांगण्यासाठी आपण आजपावेतो शांतिदूत पाठविले आहेत. संघर्ष विरहीत समाज व्यवस्था ही भारताने जगाला दिलेली सर्वात अप्रतिम आणि अमूल्य अशी देणगी आहे.<br><br>**प्रश्न :**<br><br>(अ) व्यक्तिचे जीवन यशस्वी होण्यासाठी आज कशाची गरज आहे ? 2<br><br>(ब) भारताने जगाला दिलेली सर्वोत्तम देणगी कोणती ? 2<br><br>**उत्तर :**<br><br>(अ) व्यक्तिचे जीवन यशस्वी होण्यासाठी आज माणसाचा धर्म, वर्ण, पंथ, जात, काहीही असो पण संघर्षरहित अशी आदर्श समाज व्यवस्था आवश्यक असते. 2<br><br>(ब) अनादी काळापासून भारतभूमी ही शांतीभूमी आहे. संघर्षविरहीत समाज व्यवस्था ही भारताने जगाला दिलेली सर्वात अप्रतिम आणि अमूल्य अशी देणगी आहे. 2 | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| **X.** | **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा :** **1 × 5 = 5** | |
| 44. | शालेय सहली संबंधी चौकशी करणारे पत्र सहलप्रमुख या नात्याने आगार प्रमुखास ( बस डेपो मॅनेजर ) लिहा. | |
| | **किंवा** | |
| | जिल्हा स्तरीय निबंध स्पर्धेत प्रथम आलेल्या मित्रास / मैत्रीणीस अभिनंदन करणारे पत्र लिहा. | |
| | **उत्तर : पत्रलेखन :** | |
| | i) प्रेषक पत्ता ( पाठविणाऱ्याचा तारखेसह पत्ता) 1 | |
| | ii) मायना 1 | |
| | iii) विषय मांडणी व भाषा सजावट 2 | 5 |
| | iv) समारोप व स्वाक्षरी $\frac{1}{2}$ | |
| | v) कोणाला पत्र पाठवायचे त्याचा पत्ता. $\frac{1}{2}$ | |
| | **किंवा** | |
| | **पत्रलेखन :** | |
| | i) प्रेषक पत्ता (पाठविणाऱ्याचा तारखेसह पत्ता) 1 | |
| | ii) मायना ( अधिकाऱ्याचा हुद्दा ) 1 | |
| | iii) विषय $\frac{1}{2}$ | 5 |
| | iv) मजकूर 2 | |
| | v) सही व पत्ता. $\frac{1}{2}$ | |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| **XI.** | **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पंधरा ते बीस ओळी निबंध लेखन करा : 1 × 5 = 5** | |
| 45. | (अ) आई – एक महान दैवत.<br>(ब) संगणक – एक स्नेही.<br>**उत्तर : निबंध लेखनाचे मुद्दे**<br>i) आकर्षक प्रारंभ 1<br>ii) विषय ज्ञान 2<br>iii) भाषा सौंदर्य 1<br>iv) शेवट 1 | 5 |